# शिक्षक गुंतले १५६ प्रकारच्या अशैक्षणिक कामात; अध्यापनाकडे दुर्लक्ष

## अतिरिक्त कामांच्या बोज्याने शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम; समायोजनाची प्रक्रियाही संथ; शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता कायम

**ठाणे : श्रद्धा शेवाळे**

शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून विविध उपक्रम राबविले जात असताना दुसरीकडे शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त तब्बल १५६ प्रकारची अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याचे चित्र आहे. निवडणुकीतील कामांपासून ते विविध सर्वेक्षणे, ऑनलाईन नोंदी, पोषण आहार आणि आरोग्यविषयक जबाबदाऱ्यांपर्यंत अनेक कामांचा भार शिक्षकांवर पडत आहे. शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा परिणाम होण्याची चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करण्यासाठी शिक्षण विभागाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र, दुसरीकडे अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने अनेक शाळांतील शिक्षकांची कमतरता हा प्रश्नही कायम आहे.

राज्यात विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे दोन लाखांहून अधिक शिक्षक अतिरिक्त झाल्याचे सांगितले जात आहे. या शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, गेल्या वर्षभरातही या प्रक्रियेला अपेक्षित गती मिळालेली नसल्याचे




चित्र आहे. उपलब्ध माहितीनुसार, दहा टक्के शिक्षकांचेही समायोजन पूर्ण झालेले नाही. परिणामी, एका बाजूला काही शिक्षकांवर अतिरिक्त कामांचा बोजा असताना दुसरीकडे काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता जाणवत आहे. शिक्षकांचे समायोजन वेळेत न झाल्यास त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर होण्याची शक्यता आहे.

शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांमध्ये कुटुंबनियोजन सर्वेक्षण, मतदार यादी तयार करणे व अद्ययावत करणे, बांधकामविषयक कामे, शाळास्तरीय सर्वेक्षणे, विविध समित्यांची कामे, शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी, आरोग्यविषयक नोंदी, शिष्यवृत्तीशी संबंधित प्रक्रिया, जमा-खर्चाच्या नोंदी तसेच विद्यार्थ्यांचे आधार अद्ययावत करणे आणि ऑनलाईन नोंदणी यांचा समावेश आहे. या कामांसाठी शिक्षकांचा बराच वेळ खर्च होतो. त्यामुळे अध्यापन, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे, वैयक्तिक मार्गदर्शन आणि अध्ययन निष्पत्ती तपासणे यांसारख्या मूलभूत शैक्षणिक बाबींसाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची तक्रार शिक्षकांकडून केली जाते.

राज्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे पालकांचा वाढता कल, मराठी शाळांमधील घटती पटसंख्या आणि शिक्षकांची असमान उपलब्धता यांमुळे सरकारी शाळांसमोर आव्हान निर्माण झाले आहे. गेल्या दहा वर्षांत राज्यातील शाळांमधील विद्यार्थी पटसंख्येत जवळपास २० टक्क्यांची घट झाल्याचे सांगितले जाते. तसेच राज्यातील पाचशेहून अधिक शाळा शिक्षकांविना असल्याची माहितीही समोर येत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ देणे आणि शिक्षकांची रिक्त पदे व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन यांचा प्रश्न प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे.

शिक्षकांवरील अनावश्यक अशैक्षणिक कामे कमी करण्याचा निर्णय प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविला, तर अध्यापनासाठी अधिक वेळ उपलब्ध होऊ शकतो. मात्र, त्याचबरोबर ज्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, तेथे शिक्षक उपलब्ध करून देणे आणि समायोजन प्रक्रिया वेगाने पूर्ण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या उद्दिष्टापुढे प्रशासकीय कामांचा आणि शिक्षकांच्या असमान उपलब्धतेचा अडथळा कायम राहण्याची शक्यता आहे.

**अहवाल सादर करण्याच्या शिक्षणमंत्र्यांच्या सूचना**

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या कामांमधून शिक्षकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने संघटनांची मते जाणून घेऊन अहवाल सादर करण्याच्या सूचना शिक्षण उपसंचालकांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शिक्षकांवरील अतिरिक्त कामांचा भार कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, केवळ अशैक्षणिक कामे कमी करून प्रश्न सुटणार नसून, शाळांमधील शिक्षकांची उपलब्धता आणि त्यांचे योग्य समायोजन याकडेही लक्ष देण्याची गरज आहे.

### शिक्षकांच्या माथी मारलेली अशैक्षणिक कामे

- निवडणुकीसंदर्भातील : १०
- बांधकामविषयक : ५
- शाळास्तरीय सर्वेक्षणे : ८
- विविध समित्यांची कामे : १६
- शालेय पोषण आहार योजना : १०
- आरोग्यविषयक : १०
- शिष्यवृत्तीसंदर्भातील : १५
- जमा-खर्चाच्या नोंदी : १०
- **ऑनलाईन कामे :** विद्यार्थ्यांची नोंदणी, आधार अद्ययावत करणे व विविध माहिती भरणे.
- **इतर कामे :** कुटुंबनियोजन सर्वेक्षण, मतदार यादी अद्ययावत करणे व अन्य प्रशासकीय जबाबदाऱ्या.

# महाराष्ट्रातील रसायन उद्योगासाठी लवकरच स्वतंत्र धोरण : मुख्यमंत्री

## पालघर जिल्ह्यातील पार्कसाठी ५ हजार एकर जमीन संपादित करणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील रसायन उद्योगाला चालना देत या क्षेत्रात अधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी लवकरच राज्याचे नवीन रसायन धोरण जाहीर केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केली. तसेच, वाढवण बंदराच्या परिसरात पालघर येथे भव्य रसायन पार्क उभारण्यासाठी अडीच ते पाच हजार एकर जमीन संपादित करण्याचा राज्य सरकारचा मानस असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईत १४ व्या 'इंडिया केम २०२६'चे उद्घाटन पार पडले. यावेळी फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र सरकार रसायन उद्योगासाठी स्वतंत्र आणि विशेष धोरण तयार करण्याच्या अंतिम टप्प्यात असून, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ते पूर्ण होईल. यातून उद्योगांच्या गरजा, भविष्यातील गुंतवणूक व उद्योगस्नेही वातावरण निर्मितीला प्राधान्य दिले जाईल. तसेच, वाढवण बंदराच्या परिसरात पालघर येथे भव्य रसायन पार्क उभारण्यासाठी २,५०० ते ५,००० एकर जमीन संपादित करण्याचा राज्य सरकारचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला. महाराष्ट्रात बल्क ड्रग पार्क उभारून औषधनिर्मिती क्षेत्रासाठी सक्षम औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याचे प्रयत्न सुरू असून, त्याद्वारे जेनेरिक औषधनिर्मितीत भारताचे जागतिक स्थान अधिक बळकट करण्यासह मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सध्या राज्यातील रसायन उद्योगातून सुमारे ३ लाख रोजगार निर्माण होत असून, योग्य धोरणांच्या माध्यमातून रोजगार दुप्पट आणि गुंतवणूक तिप्पट करण्याची क्षमता असल्याचा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.




मुंबई : 'इंडिया केम २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा.

# कर्जमाफीच्या चौथ्या यादीत सव्वा लाख शेतकरी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत राज्य सरकारने गुरुवारी चौथी यादी जाहीर केली आहे. या यादीत एकापेक्षा अधिक बँकांकडून पीककर्ज घेतलेल्या आणि दोन लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्यानंतर या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. यादीतील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जाणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. या योजनेंतर्गत यापूर्वी तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. पहिल्या यादीत १६ लाख ९६ हजार २०१, दुसऱ्या यादीत ४ लाख १९ हजार ७३७, तर तिसऱ्या यादीत ३ लाख ५१ हजार १९२ शेतकऱ्यांचा समावेश होता. आता चौथ्या यादीतील १ लाख १५ हजार ६९७ शेतकऱ्यांचा समावेश आहे. यानुसार आतापर्यंत एकूण २५ लाख ८२ हजार ८२७ शेतकऱ्यांच्या याद्या जाहीर झाल्या आहेत. बँकांनी योजनेच्या पोर्टलवर एकूण ३१.१७ लाख थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. पात्र ठरलेल्या १५.८५ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांत आतापर्यंत १३,२७५ कोटी रुपये कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे.

### ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या थकबाकीवर दिलासा

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरीत झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीककर्जासह पुनर्गठित किंवा फेरपुनर्गठित कर्जांना या योजनेतून दिलासा दिला जात आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत कर्जाची परतफेड झालेली नसणे आवश्यक आहे.

# व्यावसायिक वादातून तरुणाची निर्घृण हत्या

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील एन-७ सिडको परिसरात भररस्त्यात घडलेल्या हत्येचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. व्यावसायिक स्पर्धेतून आणि अंतर्गत वैमनस्यातून एका २२ वर्षीय तरुणाने आपल्याच जवळच्या मित्राचा अत्यंत निर्घृणपणे काटा काढला आहे. आधी पाठीमागून भरधाव कारने जोरदार धडक दिली आणि त्यानंतर यू टर्न घेत जखमी अवस्थेत तडफडणाऱ्या मित्राच्या डोक्यात लोखंडी रॉड आणि लाकडी दांड्याने सपासप वार करून त्याची जागीच हत्या केली. देवेश ऊर्फ बंटी चंद्रेश दीक्षित (वय ३६) असे मयत तरुणाचे नाव असून, पवन दिलीप पराशर (वय २२, रा. वानखेडेनगर) असे आरोपीचे नाव आहे.

# कोकणातील काथ्या उद्योगाची जागतिक भरारी; निर्यातीत ३०५% वाढ

## नारळाच्या करवंट्यांपासून बनवलेल्या मौल्यवान वस्तूंना परदेशात मागणी

**रायगड : जयंत धुळप**

पुढारी विशेष

भारताचा पारंपरिक काथ्या (कॉयर) उद्योग आज राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर नवनवे टप्पे गाठत आहे. केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) मंत्रालयाच्या धोरणांमुळे गेल्या १० वर्षांत या क्षेत्राच्या निर्यातीत देशपातळीवर ३०५ टक्क्यांची विक्रमी वाढ झाली आहे. या व्यावसायिक यशात कोकण विभाग अग्रस्थानी असून, स्थानिक महिलांसाठी हा उद्योग रोजगाराची संजीवनी ठरत आहे. देशातील २१,००० हून अधिक नोंदणीकृत काथ्या युनिटस् आणि ७ लाखांहून अधिक रोजगारांपैकी तब्बल ८० टक्के वाटा महिलांचा आहे. नारळाच्या करवंट्यांपासून मौल्यवान उत्पादने बनवून या महिला राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत थेट योगदान देत आहेत.

केंद्रीय एमएसएमई मंत्रालयाची 'काथ्या विकास योजना' (सीव्हीवाय) कोकणातील महिला उद्योजकांसाठी अत्यंत प्रभावी ठरत आहे. गेल्या १२ वर्षांत ६८,००० हून अधिक व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याच्या कृषी आणि सहकार विभागाच्या आकडेवारीनुसार, कोकणात ४५ हजारांहून अधिक हेक्टर क्षेत्रावर नारळाची लागवड आहे. कोकणातील चारही किनारपट्टीच्या जिल्ह्यांमधून प्रतिवर्षी सुमारे २५ ते ३० कोटी नारळांचे उत्पादन घेतले जाते. शहाळे, सुके खोबरे, काथ्या आणि इतर उपउत्पादने मिळून कोकणातील नारळ क्षेत्राची एकूण वार्षिक उलाढाल अंदाजे ६०० कोटी ते ८०० कोटी रुपयांच्या घरात जाते. यामध्ये केवळ शहाळ्यांच्या विक्रीतून वर्षाला ३५० कोटींहून अधिक रोख उलाढाल होते.

**नारळ उत्पादक क्षेत्र व जाती**

कोकणात नारळ उत्पादनात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, वेंगुर्ला, देवगड, रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, गुहागर, दापोली, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, अलिबाग, मुरूड, तर ठाणे जिल्ह्यातील वसई आणि डहाणू हे प्रमुख तालुके आहेत. गोड पाणी व मऊ खोबरे या साठी प्रसिद्ध श्रीवर्धनी रोशा, वादळ-रोधक स्थानिक जात म्हणून नाव मिळवलेला बाणवली व उच्च उत्पादनासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित केलेले 'प्रताप' या नारळाच्या प्रमुख जाती आहेत.

**भविष्यातील संधी**

ग्रामीण भागातील १ लाखाहून अधिक शेतकरी व मजुरांचा रोजगार यावर अवलंबून आहे. व्हर्जिन कोकोनट ऑईल (व्हिसीओ), नीरा, नारळाचे दूध, पावडर आणि पॅकेज्ड नारळ पाणी यांसारख्या प्रक्रिया उद्योगांना चालना दिल्यास ही वार्षिक उलाढाल १५०० कोटी रुपयांच्या पार जाऊ शकते. आधुनिक यांत्रिक उपकरणांचा वापर आणि कृषी पर्यटनाची जोड यामुळे कोकणातील नारळ शेतीला अधिक समृद्धी मिळू शकते.

- २५ ते ३० कोटी नारळांचे उत्पादन घेतले जाते चारही किनारपट्टीच्या जिल्ह्यांमधून दरवर्षी
- ६०० कोटी ते ८०० कोटी रुपयांच्या घरात जाते नारळ क्षेत्राची एकूण वार्षिक उलाढाल
- ३५० कोटींहून अधिक रोख उलाढाल होते केवळ शहाळ्यांच्या (नारळ पाणी) विक्रीतून वर्षाला
- १५० ते २०० कोटींचे उत्पन्न मिळते वर्षाला काथ्या उद्योग, कोकोपीट, नारळ तेल, झापांच्या साहित्यातून

### काथ्यापासून तयार होणाऱ्या वस्तू

- पायपुसणी आणि मॅटस्
- दोर आणि दोरखंड
- उश्या आणि गाद्या
- भांडी घासायचे ब्रश, कपड्यांचे ब्रश
- साफसफाईचे झाडू
- कोकोपीट
- जिओ-टेक्स्टाईल
- टोपल्या आणि वॉल हँगिंग्ज
- गाड्यांच्या सीटस्

# कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल 'वर्ल्डस् बेस्ट स्पेशलाईज्ड हॉस्पिटल्स २०२७' यादीत

मुंबई : मुंबईतील प्रतिष्ठित कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. प्रसिद्ध 'न्यूजवीक' आणि जागतिक डेटा प्लॅटफॉर्म 'स्टॅटिस्टा' यांच्या संयुक्त विद्यमाने जाहीर करण्यात आलेल्या 'वर्ल्डस् बेस्ट स्पेशलाईज्ड हॉस्पिटल्स २०२७' या प्रतिष्ठित जागतिक यादीत हॉस्पिटलचा समावेश करण्यात आला आहे. महिला रोग-प्रसूती शास्त्र आणि कर्करोग उपचार (ऑन्कोलॉजी) या दोन अत्यंत महत्त्वपूर्ण वैद्यकीय क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी हा बहुमान मिळाला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील डॉक्टर्स, वैद्यकीय तज्ज्ञांची मते आणि रुग्णांची घेतली जाणारी समर्पित काळजी या कडक निकषांच्या आधारे हे रँकिंग ठरवले जाते. हॉस्पिटलचे 'सेंटर फॉर कॅन्सर' प्रिसिजन ऑन्कोलॉजी, इम्युनोथेरपी, रोबोटिक-असिस्टेड सर्जरी आणि देशातील पहिली इंटरकॉन्टिनेंटल रिमोट रोबोटिक सर्जरी यांसारख्या अत्याधुनिक उपचारांसाठी ओळखले जाते. तसेच, गायनॅकॉलॉजी विभाग हाय-रिस्क प्रेग्नन्सी, अॅडव्हान्स्ड फिटल केअर आणि रोबोटिक सर्जरीमध्ये अग्रेसर आहे. येथील एंडोमेट्रिओसिस क्लिनिक हे 'युरोपियन एंडोमेट्रिओसिस लीग'द्वारे प्रमाणित भारतातील पहिले आणि एकमेव क्लिनिक आहे.

ही जागतिक मान्यता प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान आणि उपचारांप्रती आमची कटिबद्धता दर्शवते, अशी प्रतिक्रिया हॉस्पिटलचे सीईओ आणि एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. संतोष शेट्टी यांनी दिली.

# ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी मुंबईत युवक काँग्रेस आक्रमक

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली असून, लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणासाठी पक्षाकडून आंदोलन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई उत्तर-पश्चिम जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने गुरुवारी आंदोलन करण्यात आले.

'लोकशाही बचाव, संविधान बचाव', 'एसआयआर रद्द करा' आणि 'ज्ञानेश कुमार राजीनामा द्या' अशा घोषणा देत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत आपला विरोध व्यक्त केला. दरम्यान, आंदोलनादरम्यान पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या मागण्यांसंदर्भात संबंधित प्रशासनाला निवेदन देण्याची तयारीही आंदोलकांनी केली होती.


## जाहीर नोटीस

आपणांस असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल **श्री. संकेत धीरज रांभिया,** हे खालील नमूद निवासी मिळकत, ही त्यांचे वडील **कै. धीरज देवजी रांभिया** यांचे नावावरून स्वतःच्या नावे करू इच्छित आहेत. सदर **कै. धीरज देवजी रांभिया** हे खाली नमुद केलेल्या सदनिकेचे मालक होते त्यांचे दि. २४/०४/२०२६ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात **श्रीमती. हेमा धीरज रांभिया** ही विधवा पत्नी आहे व श्री. संकेत धिरज राभिया हा मुलगा आहे. **श्रीमती. हेमा धीरज रांभिया** यांनी आपला संपूर्ण अविभाजित हिस्सा हक्क व हितसंबध माझे अशिल **श्री. संकेत धीरज रांभिया** यांना दिले आहेत व सदर बाबत हक्कसोडपत्र दिनांक १२/०८/२०२६ रोजी नोंदणी क्र. मुंबई–३–१६४६६–२०२६ नुसार नोंदणी झाली आहे.

तरी सदर मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तिचा, संस्थेचा, बँकेचा, वारसाचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार किंवा हरकत असल्यास, माझ्या खालील नमूद पत्त्यावरती आपली हरकत १४ दिवसाच्या आत पुराव्यानिशी सादर करावी, अन्यथा सदरहु दावे सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल व माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचा तपशील**

रूम नं.११, पहिला मजला, गोमती चाळ, इमारत क्र. ५३०–डी–३८ए/बी, एन. एम. जोशी मार्ग, भायखळा पश्चिम, मुंबई ४०० ०११, क्षेत्रफळ ९.६२ चौ. मीटर, कारपेट एरिया, सीटी सर्व्हे क. २०२२ ऑफ भायखळा विभाग.

**पत्ता**: २६, गौरताज बिल्डींग, २२१, डॉ. बी. ए. रोड, हिंदमाता, दादर पुर्व, मुंबई ४०००१४.

सही/–
**ॲड. रविंद्र. के. बाबर**
मोबाईल नं.९८७०४७३३५७

## जाहीर नोटीस

आपणांस असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल **श्री. सर्जन रमणिक सत्रा,** यांना खाली नमूद केलेल्या दुकानाची जागा त्यांचे वडील **कै. रमणिक मेघजी सत्रा** यांचे नावावरून स्वतःच्या नावे करू इच्छित आहेत. सदर **कै. रमणिक मेघजी सत्रा** हे खाली नमुद केलेल्या दुकानाचे मालक होते त्यांचे दि. १९/०१/२०१७ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात **श्रीमती. वर्षा रमणिक सत्रा** ही विधवा पत्नी आहे व **श्री. सर्जन रमणिक सत्रा** हा मुलगा असून ते त्यांचे कायदेशीर वारस व प्रतिनिधी आहेत.

सदर दुकानाची जागा पुनर्विकासासाठी **मे. सिल्व्हरलाईन एंटरप्रायझेस** यांच्यामार्फत घेण्यात आली असून त्याबाबत दिनांक २६.१२.२०१६ रोजी पर्यायी निवासस्थानाबाबतचा करारनामा **श्री. सर्जन रमणिक सत्रा** यांच्या नावे करण्यात आला आहे.

आता **श्रीमती. वर्षा रमणिक सत्रा** यांनी सदर दुकानाच्या जागेतील त्यांचा संपूर्ण अविभाजित हिस्सा हक्क व हितसंबध माझे अशिल **श्री. सर्जन रमणिक सत्रा** यांना दिले आहेत व सदर बाबत हक्कसोडपत्र दिनांक १६/०७/२०२६ रोजी नोंदणी क्र. मुंबई–३–१४३०१–२०२६ नुसार नोंदणी झाली आहे.

तरी सदर मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तिचा, संस्थेचा, बँकेचा, वारसाचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार किंवा हरकत असल्यास, माझ्या खालील नमूद पत्त्यावरती आपली हरकत १४ दिवसाच्या आत पुराव्यानिशी सादर करावी, अन्यथा सदरहु दावे सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल व माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचा तपशील**

दुकान नं.१. तळमजला, गोमतीबाई चाळ, इमारत क्र. ५३०–डी–३८ए/बी. एन. एम. जोशी मार्ग, भायखळा पश्चिम, मुंबई – ४०० ०११, क्षेत्रफळ ९.६२ चौ. मीटर, कारपेट एरिया, सीटी सर्व्हे क. २०२२ ऑफ भायखळा विभाग.

**पत्ता**: २६, गौरताज बिल्डींग, २२१, डॉ. बी. ए. रोड, हिंदमाता, दादर पुर्व, मुंबई ४०००१४.

सही/–
**ॲड. रविंद्र. के. बाबर**
मोबाईल नं.९८७०४७३३५७

## PUBLIC NOTICE

Mr. Samir Ramanlal Shah and Mr. Rrajesh Ramanlal Shah having their residential address at 3, Adarsh Building, 94/ Walkeshwar Road, Mumbai- 400006 owner and member in respect of Unit no. 3 of Nav Adarsh Niketan Co-operative Housing Society Limited., situated at 94/ Walkeshwar Road, Mumbai- 400006 has reported having lost their Original Share Certificate bearing no. 003 dated 18th December 2016 for 10 (ten) fully paid up shares of Rs. 50/- each bearing nos. 21 to 30 (both inclusive) issued by the Nav Adarsh Niketan Co-operative Housing Society Limited and the members have requested the Society to issue duplicate Share Certificates in his favour.

NOTICE is hereby issued that parties those who are concerned, shall notify the society within 15 days from this publication, if they have any claim/ objections on the said share certificate, in writing or else the Society shall be at liberty to process the application for issue of the duplicate and thereafter, no claims of whatsoever will be considered by the Society, which shall be noted.

**Date: 23.10.2026**

For **Nav Adarsh Niketan Co-operative Housing Society Limited**
**Sd/-**
**Hon. Chairman / Hon Secretary**

## मध्य रेल्वे

### देखभालीचे काम

**ई-निविदा सूचना क्र.: आर.आर./पी.आर./एस.एन. पी.डी./४१४/२६-२७/२८. कामाचे नाव:** एस.एन. पी.डी. पी.ओ.एच. येथील व्हील शॉपसाठी सहाय्यक मशिनचा सर्वसमावेशक देखभाल करार १ वर्षासाठी. **कामाचा अंदाजे खर्चः** ₹ ११,२९,९७७.९१/-, **इसारा अनामत रक्कमः** ₹ २२,६००/-, **निविदा अर्जाची किंमतः** काही नाही (किंवा शून्य), **पूर्ण करण्याचा कालावधीः** १२ महिने, **निविदा सादर करण्याची समाप्ती तारीख आणि वेळः** १०.११.२०२६ रोजी १३:३० वाजेपर्यंत. **बोली सुरू होण्याची तारीखः** २७.१०.२०२६. निविदा केवळ **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावरून ई-निविदा स्वरूपात स्वीकारल्या जातील. निविदा दस्तऐवज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **स.का.प्र.**

अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे 682

## जाहीर नोटीस

माझे अशिल **१ .श्री. जयेश हसमुखलाल बिरवतकर आणि, २. सौ. शेफाली जयेश बिरवतकर** यांनी दिलेल्या माहीतीवरुन ही जाहीर नोटीस देत आहे की, माझे अशिल खालील नमुद निवासी मिळकत **श्री. मनाजी हरी पोटले** यांचेकडून खरेदी केलेली आहे.

सदर श्री. मनाजी हरी पोटले हे खाली नमूद केलेल्या सदनिकेचे मूळ मालक होते त्यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजी माझे अशिल १ . **श्री. जयेश हसमुखलाल बिरवतकर आणि, २. सौ. शेफाली जयेश बिरवतकर** यांच्या नावे मुखत्यारपत्र करून दिले होते.

त्यानुसार दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या विक्री करारानुसार माझे अशिल **१ श्री. जयेश हसमुखलाल बिरवतकर आणि, २. सौ. शेफाली जयेश बिरवतकर** यांनी सदर सदनिकेची खरेदी **श्री. मनाजी हरी पोटले** यांच्याकडून केलेली आहे. सदर विक्री करारनामा हा सयुक्त दुय्यम निबंधक, मबई–२–८२६० – २०२५ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत केलेला आहे.

तरी सदर खालील मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तिचा, संस्थेचा, बॅकेचा, वारसाचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार किंवा हरकत असल्यास माझ्या खालील पत्त्यावर आपली हरकत १४ दिवसाच्या आत पुराव्यानिशी सादर करावी, अन्यथा सदरहु दावे सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल व माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचा तपशील**

सदनिका नं.१२०२, बारावा मजला, बिल्डींग नं. ५ / डी, न्यु हिंद मिल म्हाडा संकुल, अनंत गणपत पवार लेन, माझगांव, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३, त्याचे क्षेत्रफळ २२५ चौ. फुट आहे. सी. एस.नं.७४९ आणि ८/ ७१६ माझगांव विभाग.

**पत्ता: २६, गोहरताज बिल्डींग, २२१, डॉ. बी. ए. रोड, हिंदमाता, दादर (पुर्व), मुंबई ४०००१४**

**सही /**
**ॲड. रविंद्र के. बाबर**
**मो. नं.९८७०४७३३५७**

## माननीय लवादासमक्ष व्यक्तिशः उपस्थित राहण्याकरिता सूचना/समन्स

**(मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ च्या कलम ८४ अन्वये)**
**भारत को-ऑप. बँक (मुंबई) लि.शी सलग्न**

**लवादाचे ठिकाणः** गीसी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., विद्यानगरी युनिव्हर्सिटी संकुल समोर, कालिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

**ज्याअर्थी भारत को-ऑप. बँक (मुंबई) लि.** यांनी खालील थकबाकीदारांविरुद्ध कर्ज थकबाकीच्या वसुलीकरिता मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२च्या कलम ८४ अन्वये केंद्रीय निबंधक यांच्याद्वारे नियुक्त लवाद या नात्याने निम्नस्वाक्षरीकार यांच्या समक्ष दावा अर्ज दाखल केला आहे.

तुम्ही सर्व यांना सदर प्रसिद्धीद्वारे उपरोल्लेखित न्यायाधिकरणासमक्ष व्यक्तिशः किंवा वकील किंवा योग्यरित्या प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे **दि. ०४ नोव्हेंबर, २०२६ रोजी दु. १२.००** किंवा त्यानंतर लगेचच, जेव्हा प्रकरण पुकारण्यात येईल, तेव्हा सदर विवादामधील दाव्यास उत्तर देण्याकरिता उपस्थित राहण्याकरिता देखील बोलावण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवाद/प्रकरण क्र. | प्रतिवादी |
|---|---|---|
| १. | **एआर/बीसीबी/आरजेके/एसएनपी/१६७५/२०२६**<br>**भारत को-ऑप. बँक (मुंबई) लि., ... अर्जदार**<br>**विरुद्ध**<br>**सौ. शिवानी मनोज कपूर, मे. नॅशनल इलेक्ट्रिकल अॅण्ड इंजिनियरिंग कन्सल्टंटचे प्रोप्रा. ... प्रतिवादी**<br>**दावा रक्कमः** (i) कर्ज खाते क्र. ००८३१३१०००००४२ अंतर्गत दि. २८.०२.२०२६ रोजी नुसार रु. ४,९९,७०६/- व थकबाकी मुद्दल रु. २,६०,०००/- वरील चक्रवाढ मासिक शिलकीसह दि. ०१.०३.२०२६ पासूनचे २% प्रति वर्ष दंडात्मक प्रभार समाविष्ट असलेले प्रतिवर्ष १५.९०% व्याज. (ii) कर्ज खाते क्र. ००८३३३५१००००६६१ अंतर्गत दि. १८.०२.२०२६ रोजी नुसार रु. ४,९६,५४५/- व थकबाकी मुद्दल रु. २,१७,९५१/- वरील चक्रवाढ मासिक शिलकीसह दि. १९.०२.२०२६ पासूनचे २% प्रति वर्ष दंडात्मक प्रभार समाविष्ट असलेले प्रतिवर्ष १५.९०% व्याज. (iii) कर्ज खाते क्र. ००८३३४०१०००००१६ अंतर्गत दि. २८.०२.२०२६ रोजी नुसार रु. ४८,०३०/- व थकबाकी मुद्दल रु. २०,७५३/- वरील चक्रवाढ मासिक शिलकीसह दि. ०१.०३.२०२६ पासूनचे २% प्रति वर्ष दंडात्मक प्रभार समाविष्ट असलेले प्रतिवर्ष १५.९०% व्याज आणि खर्च. | **१. प्रमुख कर्जदारः**<br>सौ. शिवानी मनोज कपूर, मे. नॅशनल इलेक्ट्रिकल अॅण्ड इंजिनियरिंग कन्सल्टंटचे प्रोप्रा., अंतिम ज्ञात निवासी पत्ता - सदनिका क्र. १, दर्पण रेसिडेन्सी, तालुका मनवेल, जिल्हा पुणे - ४१२ १०६ आणि बी/५०२, लक्ष्मी ग्रीन काऊंटी सोसायटी, कोंढावे धावडे एन. व्ही., शिवाणे, पुणे - ४११ ०२३. |

**नोंद घ्यावी की, वर उल्लेखिलेल्या दिवस, वेळ आणि ठिकाणी तुम्ही उपस्थित न राहिल्यास, विवादाची तुमच्या अनुपस्थितीमध्ये सुनावणी आणि निश्चिती करण्यात येईल.**

दिनांकः ०८.१०.२०२६
ठिकाणः मुंबई

माझ्या सहीनिशी आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह पारित.
सही/-
न्यायाधीश आर. जे. कोचर
**भारत को-ऑप. बँक (मुंबई) लि.शी संलग्न लवाद**
गीसी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., विद्यानगरी युनिव्हर्सिटी संकुल समोर, कालिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

## जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनाधीन)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिवाईन चाईल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई महा. ४०००९३
सीआयएन : L99999MH1992PLC066213
(माननीय एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ च्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

### ई-लिलावासाठी जाहीर घोषणा

**दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार नोटीस**

या द्वारे खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडून सर्वसामान्य जनतेला ई-लिलावाबाबत नोटीस देण्यात येत आहे, ज्यामध्ये जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) (''**कॉर्पोरेट कर्जदार**'') यांच्या मालकीच्या एका (१) मालमत्तेच्या (खालील तक्त्यात वर्णन केलेली) विक्रीसाठी बोली मागवण्यात येत आहेत, जी कॉर्पोरेट कर्जदाराच्या परिसमापन मालमत्तेचा भाग आहे, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ (''**आयबीसी**'') मधील तरतुदींनुसार आणि त्याअंतर्गत तयार केलेले नियम व विनियम, जिथे आहे, जसे आहे, जशी स्थिती आहे, जे काही आहे आणि कोणत्याही अधिकाराशिवाय या तत्त्वावर, कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व, हमी किंवा भरपाईशिवाय.

विक्री खाली स्वाक्षरी करणाऱ्या द्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचे ईबीक्राय) https://ibbi.baanknet.com (''**ई-लिलाव प्लॅटफॉर्म**'') वर, आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ चे नियम ३२ आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया मेमोरँडम दिनांक २१ ऑगस्ट २०२६ (''**एएसपीएम**'') नुसार केली जाईल. सर्व संभाव्य बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्र सादर करण्याच्या आवश्यकतांनुसार सर्व पात्रता कागदपत्रे आणि अनामत रक्कम (इएमडी) सादर करावी.

| ई-लिलावाच्या महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक | |
|---|---|
| पात्रता कागदपत्रे आणि कलम २९अ प्रतिज्ञापत्र ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ | मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६, संध्याकाळी ७:०० वाजता (युटीसी+५:३०) |
| अनामत रक्कम (''**इएमडी**'') ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ | मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६, संध्याकाळी ७:३० वाजता (युटीसी+५:३०) |
| ई-लिलावाची तारीख आणि वेळ | शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६, सकाळी ९:०० ते संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत (युटीसी+५:३०) |
| अंतिम विक्री मोबदला पेमेंटची अंतिम तारीख | खाली स्वाक्षरी करणाऱ्याद्वारे अंतिम विक्री मोबदला पेमेंटसाठी मागणी पत्र जारी केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत |

*रक्कम भारतीय रुपयांमध्ये*

| अनु. क्र. | मालमत्तेचे वर्णन | मालमत्ता आयडी | लिलाव आयडी | राखीव किंमत* | बयाणा रक्कम (ईएमडी) | वाढीव मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एअरफ्रेम बोईंग बी७३७-८०० - एमएसएन ३५६५१ - व्हीटी-जेबीएल, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई, भारत येथे स्थित<br>इंजिन १ सीएफएम ५६-७ बी (इएसएन ८९६३५३), इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ, दिल्ली, भारत येथे स्थित<br>इंजिन २ सीएफएम ५६-७ (इएसएन ८९४८९३), इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ, दिल्ली, भारत येथे स्थित<br>एपीयू हानीवेल पी-७८२३, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई, भारत येथे स्थित | ४१२२ | ५१७८ | ७२,९१,६२,००० | ७,२९,१६,२०० | ३,६४,५८,१०० |

*इतर गोष्टींबरोबरच, कर, लेव्ही, शुल्क, ड्युटी, हस्तांतरण शुल्क, स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठीचे सर्व लागू आवश्यक खर्च वगळून, जसे की एएसपीएमच्या कलम १९ (खर्च, खर्च आणि कर परिणाम) मध्ये अधिक विशेष केले आहे.) खाली स्वाक्षरी करणाऱ्या द्वारे किंवा हानीभरपाई पक्षकारांद्वारे (एएसपीएम मध्ये परिभाषित केल्यानुसार) कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा भरपाई दिली जाणार नाही.

**महत्त्वाच्या नोंदीः**

१. ही विक्री नोटीस एएसपीएम सोबत वाचली जावी ज्यामध्ये मालमत्तेचे तपशील, घोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्रे समाविष्ट आहेत, आणि बँकनेटवर उपलब्ध ई-लिलाव विक्रीचे सामान्य आणि तांत्रिक नियम आणि अटी.
२. परदेशी बोलीदारांना विशेषतः दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या एएसपीएमच्या परिशिष्टामध्ये प्रदान केलेल्या वेळापत्रक आणि पात्रता निकषांचे पालन करण्याची विनंती केली जात आहे. सर्व परदेशी बोलीदारांनी संबंधित एएसपीएमच्या परिशिष्टाची नोंद घ्यावी.
३. संभाव्य बोलीदारांनी एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार, ठरवून दिलेल्या कालावधीत आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि इएमडी केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे सादर करावीत.
४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि कागदपत्रे व इएमडी सादर करण्याबाबत कोणत्याही शंका असल्यास, संभाव्य बोलीदारांनी बँकनेटशी +९१२९१२२०२२० वर आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधावा.
५. ई-लिलावाबाबत कोणत्याही शंका असल्यास, कृपया परिसमापकाचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. निखिल लेले (+९१-९९२३६९५६५६) यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर "Aviation Asset Sale" या विषयाशी संपर्क साधावा.
६. हे स्पष्ट केले जाते की ही नोटीस खाली स्वाक्षरी करणाऱ्याच्या किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या (परिसमापनात) बाजूने विक्री अमलात आणण्यासाठी कोणतीही बंधनकारक जबाबदारी निर्माण करत नाही. खाली स्वाक्षरी करणाऱ्याद्वारे घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. हे स्पष्ट केले जाते की येथे आणि एएसपीएममध्ये नमूद केलेले मालमत्तेचे तपशील केवळ सामान्य संदर्भाच्या उद्देशाने काटेकोरपणे प्रदान केले आहेत. हानीभरपाई पक्षकार (एएसपीएम मध्ये परिभाषित केल्यानुसार) स्पष्टपणे नाकारतात आणि मालमत्तेचे वर्णन किंवा स्थितीमध्ये कोणत्याही प्रकारच्या कमचतरता/असूक्ष्मीपणा/विसंगतता/चूक विधान/वगळणे/बदलाव/तफावत किंवा त्रुटीसाठी कोणतीही हमी किंवा जबाबदारी असणार नाही, मग अशी विसंगतता ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर शोधली गेली असो वा नसो. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे, जशी स्थिती आहे आणि कोणत्याही अधिकाराशिवाय या तत्त्वावर केली जाते.
८. अंतिम विक्री मोबदला पेमेंट एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदला पेमेंट) आणि १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या कालावधी, व्याजाच्या तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
९. परिसमापक, सीओसीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यानुसार अन्यथा प्रदान केल्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवतात.

**स्वाक्षरी/-**
**सतिश कुमार गुप्ता**
**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे परिसमापक**
आयपी नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र. - AA1/10056/02/311226/108454
एएफए वैधता डिसेंबर ३१, २०२६ पर्यंत
पत्राचा पत्ता: ४०१-४०७, स्टर्लिंग सेंटर, चौथा मजला, अंधेरी-कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३
ईमेल : **liquidation.jet@gmail.com**

**दिनांक : २३.१०.२०२६**
**ठिकाण : मुंबई**